# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ जी.पी.परदेशी
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१


ज.क्र./आमाजीआ/हरविलेल्या व्यक्तीची नोंद/ कक्ष-८३/ 3148-3201 / २०१०
दिनांक :- 15/3 / २०१०

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी,
तथा जिल्हा निबंधक........सर्व
( लक्षवेधः- सांख्यिकी अधिकारी)

विषयः- हरविलेल्या व्यक्तिच्या मृत्यू नोंदी बाबत.

संदर्भः- या कार्यालयाचे दि. 1-11-2000
रोजीचे परिपत्रक.

उपरोक्त विषयातर्गत या कार्यालयाच्या संदर्भिय पत्रान्वये हरविलेल्या व्यक्तिच्या मृत्यू नोंदी बाबत मार्गदर्शन करण्यात आलेले होते. सदर विषयाबाबत मार्गदर्शन नगर पालिका स्तरावरुन मागविण्यात येत आहे. त्या करिता सदर परिपत्रकाची प्रत सोबत जोडून आपणास पाठविण्यात येत आहे.

हया परिपत्रकाच्या प्रती आपल्या जिल्हयातील महानगर पालिका,नगर पालिका,कॅन्टोमेंट बोर्ड,गटविकास अधिकारी मार्फत सर्व ग्रामसेवक यांना पाठविण्यात याव्यात व त्याची प्रत माहितीसाठी या कार्यालयास सादर करावी.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक
जन्म मृत्यू म.रा.पुणे

सोबतः दि. 1-11-2000 रोजीचे परिपत्रक व भारत सरकारच्या पत्राचा मराठी अनुवाद.

F:\83\Circular.doc

राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ एस.बी.बैरागी.
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/हव्यमृनों/१००२४-५५/२००० दि. १-११-२०००

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निंबधक जन्म-मृत्यू
जिल्हा परिषद,————(सर्व)

विषयः- हरवलेल्या व्यक्तीबाबत मृत्यूची नोंद करण्यासंबधी स्पष्टीकरण.

संदर्भः- महानिबंधक जन्ममृत्यु,भारत सरकार यांचे परिपत्रक
१/१२/८७-व्हीएस ( कॉर्ड एचपी) दिनांक ७ सप्टेंबर,२०००

मा.महानिबंधक जन्म-मृत्यू,भंरत सरकार,नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भीय परिपत्रक काढून हरवलेल्या व्यक्तीबाबत मृत्युची नोंद कशी करावी याचा सविस्तर स्वरुपाचा खुलासा यामध्ये केलेला आहे. या परिपत्रकात असे नमूद केले आहे की, हरवलेली व्यक्ती ज्या तारखेपासून हरवलेली आहे त्या दिवसापासून सात वर्षाचा कालावधी उलटून गेला असेल व न्यायालयाने निकाल दिला असेल तर कोर्टाच्या आदेशानुसार ठिकाण व तारीख लक्षात घेऊन मृत्यूची नोंदणी करावी.या संबंधी जन्म-मृत्यु नोंद कायदा १९६९ व जन्म-मृत्यु नोंदणी नियम -२००० मधे खुलासा नाही.याकरिता यासोबत जोडलेल्या परिपत्रकाचा विशेष अभ्यास करुन त्याप्रमाणे आपल्या कार्यक्षेत्रातील निबंधकाना तश्या सूचना द्याव्यात ही विनंती

स्वाक्षरी,
(डॉ.एस.बी.बैरागी)
उपसंचालक आरोग्य सेवा
(आमाजीआ) तथा
उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

प्रत माहितीसाठी सादरः मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

F:\83\Circular.doc

(श्री.नंदलाल,वरिष्ठ अनुसंधान अधिकारी,महानिबंधक भारत सरकार यांचे कार्यालय,दिनांक १५/९/२००० च्या मराठी अनुवाद पुढील प्रमाणे आहे. )

निरनिराळया राज्याच्या मुख्य निबंधक जन्म-मृत्यु कार्यालयाकडून पत्राद्वारे "बेपत्ता व्यक्ति " च्या मृत्यूच्या नोंदणी विषयी भारताच्या महानिबंधकांना विचारणा करण्यात आलेली होती. त्या प्रकरणामधे त्या व्यक्तिच्या बेपत्ता होण्याच्या दिनांकापासून सात वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे अशा व्यक्ती न्यायालयाद्वारे मृत घोषित करण्यांत येतात त्या व्यक्तिच्या नोंदणी करणा-याच्या बाबतीत व्यक्तीचा मृत्यु दिनांक व ठिकाण या बाबत स्पष्ट सूचना उपलब्ध नाहीत. अशी प्रकरणे कायदा व न्याय विभागाकडे पाठविण्यात आलेली होती. त्यांचे मार्फत दिला गेलेला सल्ला व उदाहरणे खालील प्रमाणे आहेत.

ॲव्हिडॅन्स ॲक्ट,१८७२ च्या कलम १०७ व १०८ नुसार व उपलब्ध पुराव्या नुसार संबंधीत व्यक्ति जिवंत आहे का मृत पावली आहे याची धारणा निश्चित करता येते. माननिय सर्वोच्च न्यायालयाने श्रीमती लक्ष्मी आभ्रे विरुध्द आर गोपाल पाथर ए.आय.आर. १९९५ एस.सी ९९९ नुसार कलम १०८ अंतर्गत पुढील प्रमाणे निर्णय दिला आहे. व्यक्तिचा मृत्यु कोणत्या तारखेस झाला किंवा कोणत्या तारखेस सात वर्ष मुदत पुर्ण झाले हे गृहीत धरता येत नाही. सर्वसाधारणपणे ज्या व्यक्तिच्या बाबतीत वैधानिक कालावधी पूर्ण झाला आहे त्याच व्यक्तिला मृत म्हणून घोषित करता येईल. त्या पूर्वी मृत घोषित करता येणार नाही.

बेपत्ता व्यक्तिचा,बेपत्ता होण्याचा कालावधी जर सात वर्षापेक्षा अधिक झालेला असेल,अशा व्यक्तिचा मृत्यूचा दिनांक व ठिकाणाची सत्यता निश्चित करण्याचा प्रश्न पडेल अशा प्रकरणात योग्य ते न्यायालय /अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आलेले पूरावे व तोंडी साक्षीच्या आधारे संबंधीत अधिकारी दिनांक व ठिकाणाचा शोध घेतील. जन्म-मृत्यु अधिनियम व नोंदणीकरणामध्ये बेपत्ता व्यक्तिचा मृत्यु दिनांक व ठिकाण या बाबत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. या करिता अशा वादातील प्रकरणामध्ये न्यायालयाने निश्चित केलेल्या दिनांकावर अवलंबून राहता येईल.